# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,

दापोली - ४१५७१२, जिल्हा- रत्नागिरी (महाराष्ट्र)

Web site: www.dbskkv.org


जा.क्र. कृअतंम/कृयंश/अभाससंप्र–श्रशेसु/जाहिरात/ 63 /२०२३ दिनांक: 12 JUL 2023

## जाहिरात

अखिल भारतीय समन्वीत संशोधन प्रकल्प 'श्रमविज्ञान आणि शेतीतील सुरक्षितता' योजनेअतंर्गत कंत्राटी पद्धतीने (मानधन तत्वावर) तात्पुरत्या स्वरुपात **फील्ड इन्व्हेस्टिगेटर** पद भरावयाचे आहे. महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्ह्यामध्ये जुन २०२१ ते मे २०२२ कालावधीतील कृषी अपघात सर्वेक्षण केले जाणार आहे. या सर्वेक्षणासाठी पुणे जिल्ह्यातील २० गावांची निवड करण्यात आली. प्रकल्प समन्वयक (AICRP-ESA, CIAE, Bhopal) यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार फील्ड इन्व्हेस्टिगेटरला खालील तक्त्याप्रमाणे मानधन अदा केले जाईल.

| अ.क्र | तपशिल | शुल्क (दर) रु. |
|---|---|---|
| १ | गावपातळीवरील माहिती संकलित करुन मोबाईल Android App द्वारे ऑनलाईन भरणे | ५००/– प्रती गाव |
| २ | पीडिताविषयी व अपघाताविषयी माहिती संकलित करुन मोबाईल Android App द्वारे ऑनलाईन भरणे | २००/– प्रती अपघात पीडित |

पात्र उमेदवारांनी आपले अर्ज खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यात शैक्षणिक व अन्य दाखल्याच्या मुळ सत्य प्रतीसह **दिनांक २६/०७/२०२३** पर्यंत स्वीकारले जातील. सदर अर्ज प्रमुख अन्वेषक, अखिल भारतीय समन्वीत संशोधन प्रकल्प 'श्रमविज्ञान आणि शेतीतील सुरक्षितता योजना, कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली जिल्हा: रत्नागिरी यांचे कार्यालयात जमा करावेत.

**शैक्षणिक अर्हता** :

- बी.टेक (कृषि अभियांत्रिकी)/बी.एस्.सी.(कृषिशास्त्र/वन्यशास्त्र/उद्यानशास्त्र)/विज्ञान पदवीधर/इतर पदवीधर.

**नियम व अटी :**

१. फील्ड इन्व्हेस्टिगेटरासाठी वय मर्यादा – खुल्या प्रवर्गातील उमेदवार ३८ वर्षापेक्षा जास्त असता कामा नये. (अ.ज./अ.जा. आणि इतर मागासवर्गीय यांना शासकीय नियमानुसार वय मर्यादेमध्ये शिथिलता राहील.) तसेच उमेदवारांने वयाचा पुरावा अर्जासोबत सादर करावा.

२. फील्ड इन्व्हेस्टिगेटरच्या निवडीसाठी शैक्षणिक अर्हतेचा प्राधान्य क्रम (१) बी.टेक (कृषि अभियांत्रिकी) /बी. एस्.सी. (कृषिशास्त्र/वन्यशास्त्र/उद्यानशास्त्र), (२) विज्ञान पदवीधर, (३) इतर पदवीधर असा राहिल.

३. आवश्यकतेनुसार जिल्हयासाठी एक किंवा दोन फिल्ड इन्व्हेस्टीगेटर नेमण्यात येतील.

४. उमदेवारांची निवड पात्र उमेदवारांमधून 'प्रथम येणाऱ्यास प्रथम सेवा' (first come first serve) तत्वावर करण्यात येईल.

५. सर्वेक्षण करण्यासाठी शक्यतो पुणे जिल्हातील उमेदवारांना प्राध्यान्य दिले जाईल संबधित जिल्हयातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतर ठिकाणचा उमेदवार निवडला जाईल.

६. पात्र उमेदवारांच्या अर्जाची पडताळणी योजनेतील प्रमुख अन्वेषक व इतर कर्मचारी यांच्या द्वारे करण्यात येईल.

७. उमेदवारांची नियुक्ती केवळ कृषि अपघात सर्वेक्षण पूर्ण होईपर्यंत करण्यात येईल.

८. उमेदवारांना सर्वेक्षण कामाचे मानधन दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार देण्यात येईल.

९. मानधनाव्यतीरिक्त फिल्ड इन्व्हेस्टिगेटर यांना प्रवास किंवा इतर भत्ते दिले जाणार नाहीत.

१०. सर्वेक्षण कार्यक्रम आयोजित करण्यापूर्वी निवडलेल्या फिल्ड इन्व्हेस्टिगेटरला प्रशिक्षण दिले जाईल.

११. निवडलेल्या फील्ड इन्व्हेस्टीगेटरने मध्येच काम सोडले तर प्रतिक्षा यादीतील पुढच्या उमेदवारास सदर काम दिले जाईल.

१२. तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक दिलेल्या फील्ड इन्व्हेस्टीगेटर उमेदवारास सर्वोच्य न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र. एमएलपी–५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या नियुक्तीच्या कालावधीनंतर डॉ. बाळासाहेब सांवत कोकण कृषि विद्यापीठाच्या आस्थापनेवर कायमस्वरूपी नोकरी मिळण्याचा कोणताही हक्क राहणार नाही.

सोबत: विहित नमुना अर्ज

12 JUL 2023

(व्ही. व्ही. आवारे)
प्रमुख अन्वेषक

**प्रत माहितीसाठी सविनय सादर:**

१. संशोधन संचालक /शिक्षण संचालक/ विस्तार शिक्षण संचालक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२. कुलसचिव /नियंत्रक /विद्यापीठ अभियंता, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
३. सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, दापोली / कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली/ वनशास्त्र महाविद्यालय, दापोली/ उद्यानविद्या महाविद्यालय, दापोली/ निम्नस्तर कृषि शिक्षण, दापोली. / मत्स्य महाविद्यालय, शिरगांव, रत्नागिरी/ काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, किल्ला रोहा, जि. रायगड /उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे, जि. सिंधुदूर्ग.
४. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली, ता. दापोली.
५. संचालक, क्रिडा व सहशैक्षणिक उपक्रम व विद्यार्थी कल्याण कार्यालय, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
६. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली :– आपणांस विनंती करण्यात येते की सदर जाहिरात विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी.
७. नोटीस बोर्ड – सामान्य शाखा, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

# नमुना अर्ज

१. उमेदवाराचे संपूर्ण नाव :–

२. दूरध्वनी क्रमांक :–

३. अर्ज केलेल्या पदाचे नांव :–

४. योजनेचे नाव :–

५. सध्याचा पत्रव्यवहारासाठी पत्ता :–

६. कामाचे ठिकाण ज्याकरीता अर्ज केलेला आहे :–

७. जन्मतारीख (अंक व अक्षरामध्ये) :–

८. अर्ज स्विकारण्याच्या अंतीम दिनांकाच्यावेळी असलेले वय :– वर्षे महिने दिवस

९. धर्म आणि जात:–

१०. मागासवर्गीय असल्यास जात/प्रवर्ग :– अ.जा. / अ.ज. / वि.जा. / भ.ज. / इ.मा.व. / वि.मा.प्र. :–

११. शैक्षणिक अर्हता :–

| अ. क्र. | उत्तीर्ण परिक्षेचे नांव | बोर्ड / विद्यापीठ संस्थेचे नांव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | वर्ग/श्रेणी | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१२. अनुभव :–

| अ. क्र. | नियुक्त्याचे नांव | धारण केलेले पद व वेतनश्रेणी | पासून (दिनांक) | पर्यन्त (दिनांक) | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

१३. उपरोक्त पदासाठी अन्य काही विशेष प्राविण्य अवगत असल्यास त्याबाबतची माहिती

## प्र मा ण प त्र

मी असे प्रमाणित करतो/ करते की, मी वर नमुद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य व बरोबर आहे. मी असेही प्रमाणित करतो/ करते की, मी वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास त्या माहिती आधारे मिळवलेली नोकरी गमावण्यास बांधील राहीन व त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

(अर्जदाराची नाव/सही)

ठिकाण :

दिनांक :